| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १ ला | शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत लतीफ रा. तांदुळवाडी रोड वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.२६.०२.२०२६ रोजी नांदगाव शिवारात भुम रोडवर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा डायरेक्टर पान मसाला, राजनिवास पानमसाला, एन ०१ जर्दा तंबाखु, विमल पान मसाला, गोवा गुटखा असा एकुण ४१,६७६ किंमतीचा माल कार क्र एमएच १२ एन बी१३९७ सह ४,४१,६७६ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला वाशी पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-२२३,२७४, २७५ सह अन्न सुरक्षा अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### कॉपर केबल व कन्वर्ट पॅनल व जनरेटरची तोडफोड

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे दि.२१.०२.२०२६ रोजी दसमेगाव येथील गट नं १८५ मधील कंपनीचे पॉईन्ट नं डीके ०२ या पॉईटवरील जनरेटरचे २४ कॉपर केबल व कन्ववर्ट पॅनल व जनरेटरची तोडफोड करुन अंदाजे १,२०,००० किंमतीच्या मालाचे नुकसान करुन चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोशन सुरेश निकम, वय ३५ वर्षे, रा. मालेगाव ता. मालेगाव जि. नाशिक, ह.मु. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२६.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पाणबुडी मोटारीची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-रविंद्र गाळु शिंदे, वय ३४ वर्षे, रा. पारा ता. वाशी जि. धाराशिव यांचे मांजरा नदीवरुन फक्राबाद शिवार येथील एक सोलारची ५ एस पी मोटार, चंद्रकांत शिंदे यांचे शेतातील ३ एचपीची लक्ष्मी कंपनीची पानबुडी मोटार, बाळासाहेब भराटे यांचे ५ एचपीची पाणबुडी मोटार असा एकुण २७,००० किंमतीच्या मोटारी अज्ञात व्यक्तीने दि.२४.०२.२०२६ रोजी १८.०० ते दि. २५.०२.२०२६ रोजी ०७.०० वा. सु. चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रविंद्र शिंदे यांनी दि.२६.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लग्नाचे अमिष दाखवून लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे :एका गावातील ३१ वर्षीय महिला हिस एका गावातील एका तरुणाने लग्नाचे खोटे अमिष दाखवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२६.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## कुसुमाग्रज तसेच इतर मराठी साहित्यिकांच्या साहित्याचे विशेष ग्रंथ प्रदर्शन भरवून मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



धाराशिव दि.२७ फेब्रुवारी (जिमाका) मराठी साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून आज उत्साहात साजरा करण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते जिल्हा ग्रंथालयात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून व दीपप्रज्वलन करून विविध विषयांवरील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य समाधान शिकेतोड यांच्या मुलांना वाचतं लिहितं करताना आणि कवयित्री भाग्यश्री देवकते यांच्या शब्दप्रभा या कविता संग्रहाचे प्रकाशन तसेच ज्ञानकिरण सामाजिक संस्थेच्या विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच परिसंवादाचेही आयोजन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे,उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रविंद्र खंदारे,सुप्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र अत्रे,युवराज नळे,जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य समाधान शिकेतोड,कवयित्री सुनिता गुंजाळ, भाग्यश्री देवकते,जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे,पत्रकार अनिल आगलावे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी श्री.कडवकर यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून दैनंदिन व्यवहारात मराठीतच संवाद साधण्याचे आवाहन केले.मराठीतील मान्यवर लेखक व कवी यांचे स्मरण ठेवून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासोबतच अवांतर वाचनाची सवय जोपासावी,असे प्रतिपादन त्यांनी केले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात कुसुमाग्रज तसेच इतर मराठी साहित्यिकांच्या साहित्याचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषा समिती सदस्य भैरवनाथ कानडे यांनी केले,तर महसूल सहायक कल्पना काशिद यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी,शालेय विद्यार्थी,स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंब आगारात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा




कळंब(प्रतिनिधी)-कळंब : येथील राज्य परिवहन आगारात दि. २७ रोजी मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रवाशांना गुलाब पुष्प व पेढे वाटप करून मराठी भाषेबद्दल अभिमान आणि आदर व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख विनोद अलकुंटे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मोहन जाधव उपस्थित होते. यावेळी स्थानकप्रमुख निलेश जाधव, सुरज पायाळ, प्रशांत राख आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. मराठी ही केवळ भाषा नसून आपली संस्कृती, परंपरा आणि ओळख आहे. तिचा दैनंदिन व्यवहारात सन्मानपूर्वक वापर व्हावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

बस स्थानक परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीने प्रवाशांचे लक्ष वेधून घेत कार्यक्रमाला अधिक रंगत आणली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश गोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जोतिराम तौर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी विलास जाधव, प्रभाकर झांबरे, श्रीमती प्रियंका शिंदे, आश्विनी तिडके, वाहतूक नियंत्रक सुशील हुंबे, हनुमंत मुंडे, संतोष पुरी, अलका भोसले, नामदेव जगताप, चेतन गोसावी, रामलिंग जाधवर, शाहू बाराते तसेच सर्व वाहक-चालक यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे आगार परिसरात मराठी भाषेचा गौरव साजरा करताना सांस्कृतिक अभिमानाची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

## वाहनांसाठी ४० लाख, पण शहरासाठी शून्य? धाराशिव नगरपरिषदेचा अर्थसंकल्प वादाच्या भोवऱ्यात!

**धाराशिव :( रामेश्वर डोंगरे )**- २०२६-२७ चा तब्बल ३२४ कोटींचा अर्थसंकल्प सादर झाला, पण आकड्यांच्या चमकदार खेळामागे शहराच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप जोर धरू लागला आहे. महसुली जमा ५८ कोटी ८४ लाख तर खर्च ५८ कोटी ८० लाख अपेक्षित असताना, भांडवली जमा २६४ कोटी ६३ लाख आणि खर्च २५४ कोटी १४ लाख असा मोठा आकडा मांडण्यात आला आहे. मात्र या कोट्यवधींच्या अर्थसंकल्पात शहरवासीयांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना स्थानच नाही, अशी टीका होत आहे.

घनकचरा व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह

दरवर्षी तब्बल ८ कोटी खर्च होणाऱ्या घनकचरा व्यवस्थापनासाठी यंदा फक्त २ कोटींची तरतूद! शहर कचर्याने गुदमरते आहे, दुर्गंधी वाढते आहे, पण निधी मात्र घटवला गेला - हा मोठा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नदी संवर्धन व रस्ते फंड शून्य!

नदी संवर्धन योजनेसाठी एक रुपयाचीही तरतूद नाही. रस्ते दुरुस्ती व विकासासाठीही स्पष्ट निधी दिसत नाही. जिल्ह्याचे मुख्यालय असतानाही मूलभूत सुविधांकडे पाठ फिरवल्याची चर्चा रंगली आहे.

महिलांच्या सोयींसाठीही निधी नाही

गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी आवश्यक सार्वजनिक शौचालयांची मागणी वर्षानुवर्षे प्रलंबित असताना, त्यासाठीदेखील एक रुपयाची तरतूद नसल्याचे समोर आले. मात्र वाहनांसाठी ४० लाख तयार! नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या वाहन खरेदीसाठी ४० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे जनतेपेक्षा वाहनांना प्राधान्य? असा सवाल आता जोर धरू लागला आहे.

स्मारकांसाठीही निधी शून्य




राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारक व पुतळ्यांसाठी कोणतीही तरतूद नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

आठवडी बाजारातून कर वसुलीसाठी ठेकेदार

आठवडी बाजारातील शेतकरी व विक्रेत्यांकडून कर वसुलीसाठी ठेकेदार नेमण्याचा निर्णयही चर्चेचा विषय ठरला आहे.

सारांश:कोट्यवधींचा अर्थसंकल्प मांडला गेला असला तरी शहरातील कचरा, रस्ते, नदी, महिलांच्या सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले का? वाहनांसाठी कोटींची तरतूद आणि नागरिकांसाठी शून्य - हा विरोधाभास आता धाराशिवमध्ये राजकीय व सामाजिक वादाला तोंड फोडणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. धाराशिवकरांच्या नजरा आता अंमलबजावणीकडे दिसून येत आहेत!

## युवानेते रोहित जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न ५९ युवकांनि केले रक्तदान

धाराशिव (प्रतिनिधी)- युवानेते तथा सामाजिक उपक्रमांत सतत अग्रेसर असलेले रोहित जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त धाराशिव शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर तुळजाभवानी शॉपिंग सेंटर येथे गरुडा साम्राज्य ग्रुपच्या वतीने हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.

या शिबिरात तब्बल ५९ युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. राज्यात दररोज जाणवणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेता वाढदिवसानिमित्त होणारा हार्डिंग, बॅनर, आतिषबाजी व इतर अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी बोलताना रोहित जाधव म्हणाले की, वाढदिवस हा केवळ जल्लोषासाठी नसून समाजासाठी काहीतरी देण्याची संधी आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी वाढदिवसावरील वायफळ खर्च टाळून रक्तदान, आरोग्य शिबिरे, गरजूंना मदत असे उपक्रम राबवावेत. आपण केलेले एक रक्तदान एखाद्या रुग्णाला जीवदान देऊ शकते.

गरुडा साम्राज्य ग्रुपच्या या पुढाकाराचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

या वेळी रोहित जाधव मित्रपरिवारातील समीर अरब, अविनाश चव्हाण, रोहित गुजर, रोहित डोकडे, राजू गायकवाड, विशाल कठारे, लहू पवार, ओंकार चौघुले, आकाश मंजुळे, योगेश पवार, बालाजी जाधव उपस्थित होते.

तसेच रेणुका ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. यामध्ये संजय शिंदे (संचालक), मनोज इंगळे (संचालक), सुमित मुठाळ (टेक्निशियन) तसेच मिसबा काझी, प्राजक्ता मस्के, स्वाती बेद्रे, गौरी गुजरे, वैष्णवी शिंदे आदी उपस्थित होते.

## १ मार्च रोजी भव्य विधी सेवा शिबिर व शासकीय योजनांचा लेडीज क्लब येथे महामेळावा

धाराशिव दि.२७ फेब्रुवारी (जिमाका) राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,धाराशिव, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव व जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मार्च २०२६ रोजी लेडीज क्लब,धाराशिव येथे सकाळी १० वाजता भव्य विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. न्यायमूर्ती श्री.शैलेश ब्रम्हे,उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती धाराशिव यांच्या हस्ते,प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती. अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व पोलीस अधीक्षक श्रीमती.रितू खोखर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महामेळावा होणार आहे. विविध स्टॉल्सच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती वंचित, दुर्बल व गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे व त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हे या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.मेळाव्यात जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद अंतर्गत विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय,पशुसंवर्धन कार्यालय, आरोग्य विभाग,शिक्षण विभाग, कृषी विभाग,समाजकल्याण विभाग,महिला व बालविकास विभाग,मत्स्यव्यवसाय विभाग, आदिवासी विकास विभाग,प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) तसेच इतर संबंधित विभागांमार्फत विविध योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे.या महामेळाव्यात विविध कायदेविषयक अधिकार व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरणही करण्यात येणार आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती.अभिश्री देव व सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषत: ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू व्यक्तींनी उपस्थित राहून शासकीय योजनांचा तसेच मोफत विधीसेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.

## मुलीच्या छेडछाड प्रकरणी चार वर्षे सक्त मजुरीची शिक्षा

धाराशिव (प्रतिनिधी)- मुलीच्या छेडछाड प्रकरणी महेश यास ४ वर्षे १ महिना व २ हजार ५०० रूपये दंडाची शिक्षा कळंब जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांनी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सुनावली आहे. या प्रकरणी सरकारपक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील ॲड. अशिष कुलकर्णी यांनी सक्षमपणे बाजू मांडली.

गुन्ह्याची थोडक्यात हकीगत अशी की, कळंब तालुक्यातील एका गावात दि. २५ एप्रिल २०२३ रोजी शाळेला सुट्टी असल्याने पिडिता ही घरी होती. त्यादिवशी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पिडितेच्या आईने प्रमोद यांच्या किराणा दुकानातून साखर आणण्यासाठी पाठविल्याने पिडिता साखर घेवून घरी परत येत असताना यांच्या घरासमोर त्यांच्या घरात राहणारा महेश याने पिडितीस रस्त्यामध्ये अडविले व पिडितेचा हात पकडून म्हणाला की, तु मला आवडतेस, तु माझ्या सोबत बोल, तेव्हा पिडितेने त्यास विरोध करून तु मला बोलू नकोस, मी माझ्या आई-वडिलांना तुझे नाव सांगेन. तेव्हा महेश ने पिडितेस धमकी दिली की तु कोणाला काही सांगितलेस तर तुला, तुझ्या आई-वडिलांना व भावाला मारेन. तेव्हा पिडिता घाबरून घरी निघून गेली. या घटनेपूर्वीही मागील एक महिन्यापासून हा पिडिता शाळेमध्ये जाता-येताना पिडितेच्या पाठीमागे फिरत असे व पिडितेकडे पाहून तिला त्रास देत असे. हा सर्व प्रकार तिच्या आई-वडिलांना पिडितेने सांगितल्यानंतर महेशला जाब विचारण्यासाठी गेलेल्या आई-वडिलांना मारहाण केली. त्यावरून शिराढोण पोलिस स्टेशन येथे महेशच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचा तपास सपोनि नेहरकर व पुजारवाढ यांनी केला. व दोषारोपत्र कळंब जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले.

सदरील प्रकरणामध्ये सरकारपक्षातर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पिडितेची साक्ष व इतर साक्षीदारांचे साक्षी पुरावे महत्वपूर्ण ठरले. या प्रकरणी कळंब जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांनी आरोपीस ४ वर्षे १ महिना व २ हजार ५०० रूपये दंडाची शिक्षा २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सुनावली आहे. सरकारपक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील ॲड. अशिष कुलकर्णी यांनी बाजू मांडली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## चुकीची माहिती शालेय अभ्यासक्रमात नको

देशातील नवयुवक व आधारस्तंभास चुकीचा इतिहास शिकविला जात आहे. चुकीची माहिती दिली जात आहे. चुकीच्या प्रकाराचा संताप व्यक्त केला जात आहे. भारतीयांचा इतिहास हा गौरवशाली आहे. प्रेरणास्त्रोत आहे. असे असताना ठरविकांनी मनमानी करून चुकीच्या बाबी पसरविण्याचा यशस्वी डाव खेळत असेल तर ते योग्य नाही. पुस्तकातील चुकीच्या माहितीचा परिणाम जनसामान्यात उमटला आहे. नुकतेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) आठवीच्या सामाजिक विज्ञानाच्या अभ्यासक्रमातील 'न्यायालयीन भ्रष्टाचार' या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्यानंतर गुरुवारी केंद्र सरकारने सपशेल माघार घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या मुद्द्यावर तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. मोदींच्या नाराजीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही, न्यायप्रणालीचा अपमान करण्याचा आमचा हेतू नव्हता. झाल्या प्रकाराबद्दल आम्ही खेद व्यक्त करतो, अशी नरमाई दाखवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत, न्यायिक व्यवस्थेच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर स्वत: मोदींनी भाष्य केले, असे सूत्रांकडून सांगण्यात आले. 'न्यायिक भ्रष्टाचाराबद्दल आपण आठवीच्या मुलांना का शिकवत आहोत?', अशी विचारणा मोदींनी बैठकीत केल्याचा दावा सूत्रांनी केला. 'हा विषय माध्यमिक शालेय अभ्यासक्रमात समावेश करणे योग्य होते का, या विषयाला परवानगी कशी दिली गेली, त्यासंदर्भातील प्रक्रिया काय होती,' असे प्रश्न मोदींनी विचारले होते. असे संवेदनशील विषय शालेय अभ्यासक्रमाच्या इतक्या अलिकडच्या टप्प्यात समावेश करणे कितपत योग्य होते, अशी विचारणाही मोदींनी केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, मोदींनी मंगळवारी ही नाराजी व्यक्त केली असताना त्याची वाच्यता केंद्र सरकारच्या सूत्रांकडून दोन दिवसांनंतर, गुरुवारी करण्यात आली. त्यामुळे या वादाबाबत केंद्र सरकारने बचावात्मक पवित्रा घेतल्याचे स्पष्ट झाले. या वादावर दोन दिवस कोणतेही जाहीर मत न व्यक्त करणारे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी देखील गुरुवारी, आम्ही न्यायव्यवस्थेचा आदर करतो, असे सांगितले. न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णपणे पालन केले जाईल. झाल्याप्रकाराबद्दल मला अत्यंत दुःख होत असून मी या घटनेबद्दल खेद व्यक्त करतो, असे प्रधान म्हणाले. न्यायपालिकेचा अवमान करण्याचा कोणताही हेतू नाही. 'एनसीईआरटी'ला या वादग्रस्त मुद्द्याची दखल घेण्यास सांगितले असून योग्य पावले उचलण्याचेही निर्देश दिले आहेत. तसेच, हे प्रकरण अभ्यासक्रमात समाविष्ट करणाऱ्यांविरोधात चौकशी केली जाईल व कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्रधान यांनी दिले. न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे ही घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे, असेही प्रधान म्हणाले. 'एनसीईआरटी'च्या ८वीच्या 'सामाजिक विज्ञान भाग-२'च्या नव्याने प्रकाशित झालेल्या २०२६च्या पाठ्यपुस्तकात 'समाजात न्यायपालिकेची भूमिका' या प्रकरणाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये न्यायव्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराबाबत टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयातील हजारो प्रलंबित प्रकरणे, उच्च न्यायालयांमध्ये लाखो आणि जिल्हा न्यायालयांमध्ये कोटी प्रकरणे प्रलंबित असल्याचा उल्लेख पुस्तकात आहे. या वादग्रस्त प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेऊन या पाठ्यपुस्तकाच्या प्रतींवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने बंदी घातली. पाठ्यपुस्तकाच्या २.२५ लाख प्रती छापल्या गेल्या होत्या. या पाठ्यपुस्तकाचे वितरण गुरुवारी थांबवण्यात आले. वितरित केलेल्या प्रतीही जप्त आदेश सर्वोच्च न्यायालयाने 'एनसीईआरटी'च्या संचालकांना दिले आहेत. भारतीय मुळ संस्कृती व परंपरा ही गौरवशाली आहे. भारतीय शिक्षण प्रणालीची सुरवात गुरुकुल पद्धतीने झाली होती. ती ज्ञानप्रणाली सर्वसमावेशक होती. आपले व देशाविषयक कर्तव्याची जाण यात सामावली होती. देशाचा आधारस्तंभ हा मजबुत घडविणारी होती. ही प्रणाली लॉर्ड मेकाले यांनी ओळखली व भारतीय शिक्षण पद्धतीत बदल करून गुरुकुलीय शिक्षण पद्धती बंद केली. बंदी आणली व आपल्याला पोषक व भारत कसा दिर्घ काळ गुलाम बनून राहील अशी शिक्षण पद्धती तयार करून आमलबजावणी केली. ही घटना सर्वांना माहिती आहे. तेंव्हा पासून अंधपतन सुरु झाले. शिक्षण हा मुल पाया आहे यावर घाला घालण्याचे काम केले त्यात ते यशस्वी झाले. यातील काही अंश आजही जीवंत आहे. ही बाब दुर्लक्षित करून चालणार नाही. चुकीचा इतिहास शिकविला गेला, चुकीची माहिती शिकविली गेली. मोगल साम्राज्यांचा उदो-उदो करण्याची काय गरज होती. फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास भारतीयांना शिकवुन काय उपयोग? भारतीय इतिहास मग झाशीची राणी लक्ष्मीबाई, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, पृथ्वीराज चौहाण असे किती तरी शेकडो असतील त्यांनी राष्ट्रासाठी प्राणाची बाजी लावली. असंख्य महिलांच्या शौर्यकथा आहेत. त्यांचा इतिहास का लपविला गेला. सत्तरवर्षात चुकीचा इतिहास शिकविला गेला हे कोठे तरी नमुद करावे वाटते. चुकीची माहिती देवून भारताविषयी प्रेम भावना कमी व्हावी हा कपटी हेतू काहीचा अदृश्यरित्या भारतात दिसून येतो. ते त्यात यशस्वी होताना दिसून येते. भारतीयांचा प्राचीन शिक्षणप्रणालीचा अभ्यास करून पुन्हा अमलबजावणी का करू नये? आजही महर्षी दयानंद सरस्वती व आर्यसमाजच्या प्रेरणा घेवून गुरुकुल यशस्वी रित्या चालू आहेत त्यांना प्राधान्य का दिले जात नाही. मुळात शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे जो पिणार तो गुरगुरायाला लागेल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. ते चुकीचे नाही. ब्रिटीशाचे मेकाले यांनी भारतीय शिक्षण पद्धतीत बदल करून त्याचा स्वार्थ साधला हे सत्तर वर्षात अजूनही भारतीयांना कळून येत नाही. त्यामुळे न्यायालयीन बाबीचा उल्लेख हा जाणीवपुर्णक असला पाहिजे. त्यामुळे आता यापुढे दुध पोळल्याने ताक सुद्धा फुक्कून पिण्याची वेळ आली आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. चुकीचा इतिहास किंवा काल्पीनिक इतिहास शिकविला जावू नये.

# मराठी भाषा सक्तीचीच; अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई होणार!

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी विधानसभेत लावून धरला मराठीचा मुद्दा

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात संपूर्ण महाराष्ट्र आणि विशेषकरून मुंबईत ज्या इंग्रजी, हिंदी, गुजराती व इतर विविध माध्यमांच्या शाळा आहेत तेथे मराठी भाषा सक्तीची करण्यात आली आहे काय? नसेल तर कधी करणार? असा प्रश्न राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सभागृहात उपस्थित केला.

माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी सभागृहाचे मराठी भाषे संदर्भात लक्ष वेधतांना राज्यातील एसएससी बोर्ड प्रमाणे सीबीएससी, सीएसइ, आयबी या सर्वच बोर्डाच्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी भाषा सक्तीची केलेली आहे काय आणि नसेल तर ती केव्हा करणार? अशी विचारनाही या प्रश्नाच्या अनुषंगाने केली.

यावेळी बोलतांना मराठी शाळांची पटसंख्या कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करणारा आमदार विक्रम पाचपुते



यांनी मूळ प्रश्न विचारलेला होता. ही पटसंख्या वाढवण्यासाठी, या शाळांमधून आवश्यकतेप्रमाणे शिक्षक, इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, इमारत व इतर आवश्यक त्या सुविधा पुरवण्यात याव्यात अशी मागणीही याप्रसंगी आमदार देशमुख यांनी केली.

सभागृहात उपस्थित केलेल्या या प्रश्नाला उत्तर देताना देताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधून मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे, या संदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले, मंत्री महोदयांनी या प्रश्नाला मोघम उत्तर न देता सदस्यांचा मुख्य प्रश्न लक्षात घेऊन उत्तर द्यावे सूचना याप्रसंगी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली तेव्हा, राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व भाषिक, सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आलेली आहे, एखादी शाळा त्याची अंमलबजावणी करत नसल्याची तक्रार आल्यास ती शाळा व त्या शाळेच्या व्यवस्थापनावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दिली .

## अनिल अंबानींच्या अडचणी वाढल्या; ईडीनंतर सीबीआयकडून कार्यालय आणि निवासस्थानी शोधमोहीम सुरु

नवी दिल्ली : केंद्रीय अन्वेषण ब्यूरोने म्हणजेच सीबीआयने मेसर्स रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या विरोधात दुसरा गुन्हा नोंदवला आहे. बँक ऑफ बडोदाकडून २४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आधारे, कट रचणे, फसवणूक करणे या आरोपांप्रकरणी भारतीय दंड संहितेअंतर्गत आणि गुन्हेगारी गैरवर्तन आणि अधिकृत पदाचा गैरवापर, यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत ठण्दशब, मेसर्स रिलायन्स कम्युनिकेशन्सचे प्रवर्तक आणि माजी अध्यक्ष अनिल अंबानी आणि इतरांविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मेसर्स रिलायन्स कम्युनिकेशन्सने घेतलेल्या कर्जाच्या रकमेतून संबंधित पक्षांसोबत बनावट व्यवहार निर्माण करून निधी वळिवणे आणि गैरवापर केल्यामुळे बँक ऑफ बडोदाचे २ हजार २२० कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप एफआयआरमध्ये आहे. तसेच मेसर्स रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या लेखापुस्तकांमध्ये फेरफार करून अनियमितता लपविण्यात आल्याचेही आरोप आहेत.

# विद्यार्थी काँग्रेसची नूतन कार्यकारणी जाहीर

## जिल्हा उपाध्यक्षपदी महेश सोळंके तर शहर सचिव पदी प्रथमेश राठोड यांची वर्णी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा व शहर एनएसयूआय कार्यकारिणी संरचना २०२६ जाहीर करण्यात आली असून विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवा पिढीमध्ये राष्ट्रचेतना जागवून विद्यार्थ्यांना राष्ट्रउभारणीच्या कार्यात सहभागी करून घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अठरापगड जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना एकत्रित आणत संघटन बळकट करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

ही कार्यकारिणी महाराष्ट्राचे सहकार महर्षी मा. दिलीपराव देशमुख, लातूर शहरचे आमदार व माजी पालकमंत्री मा. अमित देशमुख, लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. शिवाजी काळगे लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर डीसीसी बँकेचे अध्यक्ष मा. धीरज देशमुख, लातूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मा. अभय साळुंखे, लातूर शहर काँग्रेस अध्यक्ष मा. किरण जाधव तसेच एनएसयूआयचे राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र राज्य निरीक्षक मा. अक्षय यादव क्रांतिवीर आणि प्रदेशाध्यक्ष मा. सागर साळुंखे, नॅशनल स्टुडन्ट ऑफ इंडिया लातूर जिल्हा अध्यक्ष रोहित बिराजदार यांच्या संमतीने जाहीर करण्यात आली आहे.

या निवडीत विद्यार्थी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी महेश साळुंखे यांची, तर शहर सचिवपदी प्रथमेश राठोड यांची निवड करण्यात आली आहे. तसेच इतर विविध पदांवर महेश साळुंखे, उज्वल बडगे, कमलेश वारद, प्रशांत शिंदे, आवेस शेख, लक्ष्मीकांत





सावंत, अबुजर शेख, गणेश बंडगर, यश मोरे, अजय साळुंखे, श्रावण काकडे, मयूर सूर्यवंशी, रिजवान सय्यद, चैतन्य पवार, अस्जद शेख, कृष्णा राठोडकर, सार्थक गायकवाड, रसूल शेख, रियान शेख, वैभव जमगे, उवेश पठाण, प्रणव पाटील, चैतन्य रोडे, वैभव वानखेडे, अरिव शेख, सुफियान नाईकवाडे, रेहान कोतवाल, सुरेश इटकर, ऋषिकेश कांबळे, साहिल शेख, प्रज्वल शिंदे, गणेश ताटे, रियान अत्तर, कृष्णा यदनरे, ऋषिकेश बिराजदार, चैतन्य माने व अझहर शेख यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांनी संघटन मजबूत करून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# शिवशाही ग्रुप, महाराष्ट्रच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## सामाजिक उपक्रमातून शिवशाही ग्रुपने जोपासला शिवरायांच्या विचारांचा वारसा



**लातूर/प्रतिनिधी :**अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवशाही ग्रुप, महाराष्ट्र च्यावतीने यशवंत प्राथमिक विद्यामंदिर, नांदेड रोड, लातूर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. छत्रपती शिवरायांचा विचार बालवयापासूनच मनावर कोरले तर नवी पिढी संस्कारी व देशहीत जोपासणारी होईल. यामुळे शिवरायांचे विचार प्रत्येकापर्यंत पोहचवण्यासाठी शिवशाही ग्रुप सदैव कार्यरत असल्याचे संस्थापक अध्यक्ष चैतन्य फिस्के यांनी यावेळी सांगितले.

शिवशाही ग्रुप महाराष्ट्र राज्य लातूर च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. यावर्षी यशवंत प्राथमिक विद्यामंदिर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून यशवंत प्राथमिक विद्यामंदिर च्या मुख्याध्यापिका सौ. थोरात मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणुन शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष प्रकाश देशमुख, प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक अँड. अतिश चिकटे, भाजपा सदस्य अँड. लवकुमार तोष्णीवाल व शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमर देशमुख यांची उपस्थिती होती.

यावेळी शिवशाही ग्रुपचे सं. अध्यक्ष चैतन्य फिस्के, प्रमुख ऋषिकेश क्षीरसागर, अभय जाधव, अजय पिडगे, सुनील जगदाळे, अविनाश डोंगरे, दीपक राठोड, रोहित लाड, आशुतोष गड्डे, अभिषेक रेड्डी, विजय पवार, रोहित कुंभारकर, शैलेश साखरे, सुयोग कातळे, विजय महाजन, श्याम गुंजोटे, लिंगराज किवडे, श्याम खंडागळे, शुभम जाधव, महेश बावगे, आदित्य राऊत, गौस बागवान, श्रेयश मुंडलिक, अविनाश पाटील, हितेश डागा, आकाश प्रयाग, अभिषेक जंगम, सोमनाथ विभुते, सौरभ राठोड, चैतन्य प्रयाग, शिवम कसबे, शिवशांत माशाळकर, शेखर रामतीर्थे व धनराज शेटे या सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुलक्षणा पाटील यांनी केले तर आभार पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत प्राथमिक विद्यामंदिर चे सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी मेहनत घेतली

## लातूर जिल्ह्यातील संघटित किरकोळ व्यापार क्षेत्रातील मानव संसाधन व्यवस्थापनाचा अभ्यास; श्रावण बनसोडे यांना डॉक्टरेट बहाल



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील संघटित किरकोळ व्यापार क्षेत्रातील मानव संसाधन व्यवस्थापनावर आधारित अभ्यास प्रबंध सादर करून श्रावण बबन बनसोडे (कनिष्ठ लेखा अधिकारी, जि. प. धाराशिव तथा माजी सहाय्यक प्राध्यापक, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून डॉक्टरेट पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



''लातूर जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह संघटित किरकोळ व्यापार क्षेत्रातील मानव संसाधन व्यवस्थापनाचा अभ्यास'' या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केले. या अभ्यासामध्ये कर्मचारी भरती प्रक्रिया, प्रशिक्षण व विकास, कार्यप्रदर्शन मूल्यमापन, वेतन धोरण, कर्मचारी समाधान तसेच संघटनात्मक रचना यांचा सर्वांगीण ऊहापोह करण्यात आला आहे. स्थानिक उद्योगांच्या वाढीसाठी प्रभावी मानव संसाधन व्यवस्थापनाचे महत्त्व या प्रबंधातून अधोरेखित झाले आहे. या संशोधनासाठी डीन डॉ. एच.एस. पतंगे यांचे मार्गदर्शन लाभले. संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ. एम.डी. कच्छवे यांनी मोलाचे सहकार्य केले, तर बाह्य परीक्षक म्हणून डॉ. अनुरुथ चेंद्रे यांनी प्रबंधाचे परीक्षण केले.

कुटुंबियांचा मोलाचा वाटा

या यशामागे आई कल्पना बनसोडे, वडील बबन बनसोडे, पत्नी विशाखा बनसोडे, मुलगा विराज बनसोडे तसेच भाऊ किरण बनसोडे यांचा मोठा वाटा असल्याचे श्रावण बनसोडे यांनी नमूद केले. कुटुंबियांच्या प्रेरणा व पाठबळामुळे संशोधनाचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मान्यवरांकडून अभिनंदन

या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे तसेच उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी ज्ञानराज पौळ यांनी श्रावण बनसोडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघटित किरकोळ व्यापार क्षेत्राच्या विकासासाठी मार्गदर्शक ठरणारा हा अभ्यास लातूर जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, श्रावण बनसोडे यांच्या यशामुळे धाराशिव व लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात व्हर्व्ह जिल्हास्तरीय स्पर्धेचा उत्साह; संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांच्याकडून कौतुक




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात व्हर्व्ह २०२५-२६ या जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद मिळाला. दरम्यान, गुरुवारी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांनी स्पर्धेदरम्यान भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

गुरुवारी सकाळी बेस्ट आउट ऑफ वेस्ट ही स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून अनेक टिकाऊ वस्तू तयार केल्या. एका स्पर्धक विद्यार्थीनेने तर वर्तमानपत्राच्या कागदापासून ड्रेस तयार केला आणि तो ड्रेस स्वतः परिधान करत साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. याशिवाय इतर सहभागी स्पर्धकांनी कागद, प्लास्टिक तसेच घरातील इतर टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार केल्या. यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, व्हर्व्ह स्पर्धा आयोजक डॉ. लक्ष्मीकांत सोनी आदींची उपस्थिती होती. २०१४ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात व्हर्व्ह ही स्पर्धा आयोजित केली जाते. या अंतर्गत पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्विझ, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट, टॅली टॅलेंट हंट, अप्टिट्यूट ॲबिलिटी आणि ॲड-ओ-मेनिया आदी स्पर्धाचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये असणारे कौशल्ये सादर करता यावे, या हेतूने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, रेणापूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ यासह लातूर शहरातील विविध महाविद्यालयातील एकूण १ हजार २२६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान चालणार असून, आज २७ फेब्रुवारी रोजी या स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे. सूत्रसंचालन प्रा.अक्षय पवार, प्रा.अजय चव्हाण यांनी केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरिता व्हर्व्ह आयोजक डॉ. लक्ष्मीकांत सोनी, समितीतील सदस्य प्रा. दगडू शेख, डॉ. आकांक्षा भांजी, प्रा. सुहाना शेख, डॉ. प्रेमसागर मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. क्षितिज कांबळे आदी परिश्रम घेत आहेत.

# दिवेआगार-हरिहरेश्वर-श्रीवर्धन



शरसरीसुट्टया लागल्या की रोजच्या धकाधकीच्या जीवनातून जर चार दिवस शांत आणि निसर्गरम्य परिसरात घालवायला मिळाले तर याच्याइतका आनंदाचा क्षण अजून कुठला असेल? आणि हे सर्व जर खिशाला परवडेल अशा दरात जर मिळाले तर दुधात साखरच पडली म्हणायचे. असा हा मजेत सुट्टी घालवण्यास उत्तम परिसर म्हणजे दिवेआगार- श्रीवर्धन-हरिहरेश्वर परिसर. या परिसरात कसे जायचे?

हा परिसर रायगड जिल्ह्यात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील गोरेगावच्या पश्चिमेला येतो. जर तुम्ही पुण्यावरुन निघणार असाल तर रेल्वेची सोय नाही. स्वारगेटवरुन थेट दिवेआगार बस जाते आणि तिचा मार्ग पुणे-पौड-ताम्हिणी-डोंगरवाडी-आदरवाडी-विळे-माणगाव-गोरेगाव-दिवेआगार (सुमारे १५० कि.मी.). दुसरा एक मार्ग भोर मार्गे वरंधा घाटातून गोरेगावला जातो आणि तिथून पुढे दिवेआगार. मुंबईहून या प्रदेशात येताना मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गाने कोलाड, माणगावच्या पुढे गोरेगाववरुन दिवेआगारला जाता येते.

**राहण्याची व जेवणाची व्यवस्था**

कुठेही निघताना ही सर्वात महत्वाची गोष्ट असली तरी इथे जाताना त्याची काळजी करण्याचे कारण नाही. कारण तिथली अतिशय प्रेमळ माणसे म्हणजे श्री. सुहास बापट आणि त्यांच्या पत्नि सौ. वर्षाताई बापट, तुम्ही फक्त त्यांचा फोन नबंर ०२१४७-२२४३७७ लक्षात ठेवा आणि केव्हाही फोन करुन तुमचे बुकिंग करा. राहायची व्यवस्था तर ते करतीलच पण चहा, फराळ आणि भोजन यासर्व गोष्टी तुम्हाला इतक्या प्रेमाने आणि अतिथ्यशिल पणे देतील की तुम्हाला घराबाहेर आहोत असे भासणारच नाही. त्याच्यांकडील फणसाची भाजी, उकडीचे मोदक यासारखे पदार्थ जर खाल तर अण्णपूर्णा ह्या शब्दाचा खरा अर्थ कळेल. काही स्पेशल गोष्टीं खाण्यासाठी आधी पूर्व कल्पना द्यावी लागते ऐवढेच. हो पण याच्याकडे फक्त शुध्द शाकाहरी जेवणच मिळेल, मासांहरी लोकासाठी दुसरीकडे जेवणाची व्यवस्था आहे. राहण्याची सोय म्हणजे खरोखरीच कोकणातील घरांचे पुस्तकांत वाचलेले वर्णन. नारळी पोफळीच्या बागेतील कौलारु घर, त्याच्या पुढे आणि मागे मोठे सारवलेले अंगण, तेही अगदी स्वच्छ, भरपूर पाणी आणि स्वच्छ मोकळी हवा. जिथून समुद्र अगदी पाच दहा मिनीटांच्या अतंरावर. समुद्राच्या पाण्याची खळखळ तुम्हाला अगदी घरातुनच ऐकायला येते आणि ह्याची मजा काही वेगळीच आहे.

दिवेआगर परिसर

ऊर्ळींशरसरी इशरलहइथले मुख्य आकर्षण म्हणजे ४-५ कि. मी. लांबीचा शांत समुद्रकिनारा. जिथे सकाळ संध्याकाळ तुमचा वेळ इतका शांत आणि छान जाईल की विचारु नका. कारण कुठल्याही प्रकारची अस्वच्छता किंवा दुकाने, फेरीवाले इथे दृष्टीस पडणार नाहीत. शांत वाळूवर पहूडायचे किंवा समुद्राच्या लाटांवर खेळायचे. इथला समुद्रही खूप शांत आहे आणि वाळू बिलकूल घसरत नाही, त्यामुळे भितीचे आजिबात कारण नाही. संध्याकाळी सूर्यास्त पहायला एक वेगळीच मजा येते. एवढया अथांग समुद्रात सुर्याचा लालबुंद गोळा बुडतानाचे ते दृष्य खरोखरीच अविस्मरणीय आहे. इथले अजून एक महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे इथले सुवर्णगणेश मंदिर. या मंदिराजवळ श्रीमती द्रौपदी धर्मा पाटील यांच्या नारळी पोफळीच्या बागेत जमिनीखाली खणताना एका तांब्याच्या पेटीत हा गणेशाचा सोन्याचा मुखवटा सापडला, जो त्यांनी गणेशमंदिर विश्वतांकडे सुपूर्त केला आणि त्याची स्थापना मंदिरात करण्यात आली. आणखी इथली एक वैशिष्टपुर्ण गोष्ट म्हणजे येथील रुपनारायण मंदिर. ज्याची एक ते दीड मीटर उंचीची दुर्मिळ मूर्ती येथे पाहायला मिळते.डेलरींळेप खलेप

## शरीराची अतिरिक्त चरबी (फॅट) कमी करण्यासाठी...



आपले वजन/चरबी कमी करण्यासाठी आहारनियमित व्यायाम आणि जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. दररोज ३०-४५ मिनिटे वेगाने चालणे/व्यायामसाखर-मैदा वर्ज्य करणेआहारात प्रथिने (झ्रीेंशळप) आणि फायबर वाढवणेआणि भरपूर पाणी पिणे यामुळे पोटाची व शरीराची चरबी कमी होण्यास मदत होते. चरबी कमी करण्यासाठी प्रभावी टिप्स:आहारातील बदल -साखर आणि मैद्याचा त्याग: गोड पदार्थबिस्किटेकेक आणि मैदायुक्त पदार्थ पूर्णपणे टाळा ६.प्रथिने वाढवा: आहारात कडधान्येडाळीअंडीपनीर आणि दही यांचा समावेश कराज्यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहते १७.कमी कार्ब्सजास्त फायबर: भात-पोळीचे प्रमाण थोडे कमी करून भाज्या आणि फळांचे (विशेषतः सफरचंदनाशपाती) प्रमाण वाढवा १४.दही खा: पचन सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी दही खूप फायदेशीर आहे ७.व्यायाम आणि शारीरिक हालचाल (एुशीलळीश):नियमित व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे वेगाने चालणेधावणेसायकलिंग किंवा योगासने करा ३. पोटाचे व्यायाम: पोटाची चरबी कमी करण्यासाठी प्लँक्सक्रंचेस सारखे व्यायाम करा

## माझी भाषा, माझा अभिमान



**श्रेष्ठ प्रतिभासंपन्न कवि कुसुमाग्रज यांची आज (दि.२७ फेब्रुवारी) जयंती. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक. त्यांचा जन्मदिन ङ्गमराठी भाषा गौरव दिनफम्हणून साजरा केला जातो. मराठी या आपल्या मातृभाषेचा गौरव आणि कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून या दिवसाचे औचित्य आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे यानिमित्ताने स्मरण केले जाते. खरे तर १ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. तेव्हापासून तो दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा होत असला, तरी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या भवितव्याचा विचार होणे तेवढेच महत्त्वाचे ठरते.**

### रामदास नेहूलकर

जागतिकीकरणामुळे आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. केवळ मातृभाषेच्या वापराखेरीज अन्य भाषांनाही तेवढेच महत्त्व आले असताना मातृभाषा मराठीच्या भवितव्याबदद्दल चिंता व्यक्त होणे अनाठायी नाही. अशा स्थितीत मराठी भाषेच्या संवर्धनाची आणि काळाच्या ओघात ती टिकवण्याचे आव्हानही नव्या पिढीसमोर आहे, हे नाकारून चालणार नाही.

मराठी भाषा आपल्या दृष्टीने केवळ संवादाचे माध्यम नाही, महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचा आत्मा आहे. अमृतातही पैजा जिंकी अशा शब्दात संत ज्ञानेश्वरांनी गौरवलेल्या मराठीची हजार दीड हजार वर्षांहून मोठी परंपरा आहे. संत, पंत आणि तंत यांच्या साहित्यातून ती समृद्ध झाली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव यांनी अभंग आणि ओव्यातून मराठीचा गोडवा वाढवला. आधुनिक साहित्यिकांनी त्यांच्या लेखनातून ती आणखी समृद्ध बनवली. लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी असे आपण अभिमानाने म्हणतो. मराठीच्या अधिकाधिक वापरासाठी आग्रही राहतो. याचे कारण हा महाराष्ट्र आणि मराठी भाषा ही मराठी माणसाची ओळख आणि अस्मिता आहे. आपली भाषा, आपली संस्कृती यांचा अभिमान जपणे हे आपले कर्तव्यच ठरते. मात्र केवळ भाषिक अस्मिता जपण्याखेरीज भाषेचे सौंदर्य, संस्कृती आणि परंपरा जपण्याचीही आपल्यावर जबाबदारी आहे.

जग झपाट्याने बदलत आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आणि नव्या तंत्रज्ञानामुळे मराठी सारख्या प्रादेशिक भाषा दुय्यम ठरू लागल्या आहेत. शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे मराठी शाळांची स्थिती केविलवाणी झाली आहे. पालक आणि पाल्यांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे वाढला आहे. मातृभाषेतून शिक्षण घेणार्यांची संख्या घटणे हे भाषेच्या भवितव्याच्या दृष्टीनेही घातक आहे.

त्यातच नोकरीसाठी इंग्रजी भाषा यायलाच हवी अशा प्रकारची सामूहिक मानसिकता तयार झाली आहे. किंबहुना मराठी व्यवहाराची भाषा नाही असाही गैरसमज रूढ होऊ पाहात आहे. दुकानाच्या पाट्या मराठीत हव्यात असा कायदा असूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. कायदे असूनही कार्यालयीन कामकाजात मराठीचा वापर सक्तीने केला जात नाही. नव्या पिढीला मराठीतून बोलण्याची लाज वाटते की काय, पण त्यांच्या संवादात मराठीपेक्षा हिंदी, इंग्रजी शब्दांचाच वापर अधिक असतो. इंग्रजी, हिंदीच्या अवाजवी वापरामुळे मराठीची गोडीच हरवत चालली आहे. मराठी भाषा नव्या तंत्रज्ञानाशी जोवर जोडली जात नाही, तोवर ती नव्या पिढीला आकर्षित करू शकणार नाही. शासकीय कार्यालये, न्यायालये आणि निमशासकीय संस्थांमध्ये मराठीचा वापर अनिवार्य आणि सहज असायला हवा. मराठी कुटुंबातील पालकांनी पाल्यांशी असलेला संवाद मराठीतूनच करायला हवा. आपल्या पाल्याला मराठीची आवड निर्माण करण्यासाठी त्यांना मराठी पुस्तकांच्या वाचनाची सवय लावायला हवी. विविध कंपन्यांच्या ग्राहक कक्षांनी ग्राहकांशी संवादासाठी तसेच बँकाचे व्यवहार आणि जाहिरात क्षेत्रामध्ये मराठीचा अधिक वापर व्हायला हवा. भाषा केवळ संवादाच्या साधनापेक्षा ती आपल्या मातीची आणि संस्कृतीचीही ओळख ठरायला हवी.

मुंबई, पुणे यासारख्या महानगरामध्ये हिंदी भाषिक पट्ट्यातून येणार्या लोकांमुळे भाषिक समीकरणे बदलत आहेत. त्यांच्याशी संवाद साधताना मराठीपेक्षा हिंदी किंवा इंग्रजीचाच वापर केला जातो. मराठीचा संकोच होण्याचे तेही एक कारण ठरते. दाक्षिणात्य राज्यांमध्ये त्यांची भाषा शिकणे, अनिवार्य असते. कर्नाटक, तामिळनाडू सारख्या राज्यात हिंदीला 'पर्याय' म्हणून पाहिले जात नाही. तेथील माणूस परप्रांतीयाशीसुद्धा शक्यतो कन्नड मध्येच बोलतो. याउलट मुंबईसारख्या शहरात अनोळखी व्यक्तीशीही आपण मराठी ऐवजी हिंदीतूनच संवाद साधणे पसंत करतो. ही आपली अति सोयिस्कर वृत्ती मराठीच्या मुळावर येत आहे. हिंदीच्या प्रभावा विरोधात दक्षिणेकडील राज्यांनी आंदोलनेही केली आहेत. याचे कारण त्यांची भाषा ही त्यांच्यासाठी अस्मिता आहे.

पहिलीपासून हिंदीच्या तिसरी भाषा म्हणून सक्तीच्या निर्णयाला महाराष्ट्रात विरोध झाला पण तो तेवढा प्रखर नव्हता. सरकारच्या लवचीक धोरणामुळेही मराठीची उपेक्षा होत आहे. दाक्षिणात्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही मराठी हीच कामकाजाची, रोजगाराची भाषा कशी होईल हे पाहिले पाहिजे. जोवर आपण मराठीचा आग्रह धरत नाही, तोपर्यंत बदल घडणे अवघड आहे. आपल्या भाषेचा आदर करणे म्हणजे दुसर्या भाषेचा द्वेष करणे नव्हे, तर आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे होय.

या सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होत असल्याचे आढळते. अर्थात त्यामुळे मराठीचे महत्त्व कमी झाले असे म्हणता येत नाही. मराठी भाषा टिकवण्याच्या आव्हानांबरोबर काही सकारात्मक बदल घडत आहेत. त्याच्या अनुषंगाने मराठीला ऊर्जितावस्था येऊ शकेल. समाजमाध्यमे, युट्युब किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर मराठी आशयाला (लेपींशपीं) मोठी मागणी आहे. अनेक तरुण मराठीतून दर्जेदार ब्लॉगिंग आणि पॉडकास्ट करीत आहेत. मराठीला अभिमत दर्जा मिळाल्याने भाषेच्या संशोधनाची आणि विकासाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. दुकानाच्या पाट्या मराठीतून लावण्याची सक्ती करण्यासारख्या निर्णयामुळे मराठी भाषेला कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. मराठीचे महत्त्व कमी होण्यापासून रोखण्यासाठी लढा देण्याऐवजी मराठीचा वापर वाढवणे हा रास्त पर्याय ठरतो.

इंग्रजी शिकायलाच हवी, कारण ती ज्ञानभाषा आहे; पण त्यासाठी मराठी विसरणे नको, बँका, मॉल कंपन्यात हिंदीऐवजी मराठीतूनच संवाद ठेवायला हवा. मराठीच्या अभिवृद्धीसाठी मराठी पुस्तके विकत घेणे, मराठी नाटके, मराठी चित्रपट पाहणे पसंत करा त्यामुळे मराठीला आर्थिक पाठबळ मिळेल. शासकीय कार्यालयात मराठीचा वापर वाढला, कागदपत्रे मराठीत (अर्थात सोप्या मराठीत) उपलब्ध झाली तर खर्या अर्थाने मराठी व्यवहाराची भाषा होईल. इंग्रजी किंवा हिंदी न समजणार्या ग्रामीण जनतेची त्यामुळे अडवणूक होणार नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळात मराठी विषय नावापुरता ठेवण्याऐवजी दहावीपर्यंत तो सक्तीचा हवा.

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत हजारो विद्यार्थी मराठी या विषयातच नापास होतात. गेल्या वर्षी ही संख्या ६४ हजार इतकी होती. मात्र तेच विद्यार्थी इंग्रजीत मात्र उत्तीर्ण होतात. त्यामुळे भाषा शिक्षणाचा विचार केवळ औपचारिक शिक्षणापुरता उरला आहे का असे वाटते. मराठी कुटुंबातील मुलांनाच स्वतःची भाषा उत्तम प्रकारे अवगत नसेल तर आणि मातृभाषेतच मुले नापास होत असतील तर मराठी भाषेचा समृद्ध प्रवास घडणार तरी कसा? डिजिटल माध्यमात मराठीचा अधिकाधिक वापर, वाचन संस्कृतीची वृद्धी, आणि मराठी भाषेविषयी जागरूकता आणि संवादाची तीच भाषा यातूनच मराठी भाषेची जपणूक होऊ शकेल.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सहवासचा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सहवास मध्ये सुधार आणू शकता.१. सहवास कण्याआधी ओरल सहवास करणे महत्वाचे आहे. ही क्रिया सहवास मध्ये महत्वाची भूमिका बजावते. या क्रियेमुळे तुम्ही सहवास चा आनंद खूप चांगल्या प्रकारे घेऊ शकता. २. परुष असो किंव्हा स्त्री त्यांना या गोष्टीची माहिती हवी असली पाहिजे कि आपला पार्टनर खुश कशामुळे होतो.


## २ Joke — विनोद




**शिक्षक : गव्हाचे सगळ्यात जास्त उत्पादन कोठे होते?**

**विद्यार्थी : शेतात.**

## ३ Message — संदेश



Aik rikshaw ke peche likha tha k
"SAWAN KA INTAZAR HAI"
Peche se aik truck aya or rikshaw ko oraa dia(hit kia)
or us ke peche likha tha "AYA SAWAN JHOOM KE".

## ४ Thought — सुविचार



संधी या देवतेच्या डोक्यावर एकही केस नसतो.
- टेरेन्स


**संस्कृत सुभाषित**

**अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन्**
**लभते बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ।।**

(उद्योगपर्व, अध्याय ३९, ेक २ महाभारत)

अर्थ -

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मागाहून, मग
३. कथांमधील भला मोठा नाग
६. सापाची एक जात
९. तळे, धरण, विहीर इ.
११. एक मंगल वाद्य
१३. वागणूक
१४. परमेश्वर
१५. मोठा डेरेदार वृक्ष
१८. विल्हेवाट, निकाल (लावणे)
१९. अंगावरील बारीक केस
२२. कबूतर
२३. चंद्र, एक वनस्पती
२५. मुलगा-मुलगी
२८. अत्यंत धनाढ्य मनुष्य
३२. काळ्या तोंडाचा हुप्प्या
३३. करसेवेचा अपभ्रंश - सेवा
३४. रोग झालेला, आजारी
३५. सारखा
३६. सदोदित
३७. चिवचिवाट
३९. हुबेहुब प्रत बनवणारा
४१. मांडणी, सजावट
४२. शुष्कता
४३. धुणे
४७. धुसफूस
४९. धातूचा धागा
५०. बुजणारी
५१. तारीख
५२. पद्धतीप्रमाणे
५३अ. पाणी
५४. मांडी न घालता बसलेला
५५. नेहमी, वारंवार
५७. खाट, चौपाई
५८. युवराज
६०. सापाची एक जात
६१. आपला नसलेला
६३. बातमीदार
६५. घोडागाडी
६६. धमकी
६७. त्रास, वैताग, बडबड
६९. पाठविलेला
७१. रवाळ
७३. मूळ आधार
७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार
७६. डोळे
७८. हाताचा तळवा
७९. पाप
८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके)
८१. पादत्राण

### उभे शब्द

१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन
२. दुलई
३. नष्ट
४. मृत
५. रमापती
६. जमीनदोस्त
७. तृण
८. द्रव्य, पैसा
१०. प्रेत (हिंदी)
१२. नूतन
१६. भारतीय चलन
१७. पाठवणी
२०. जमीनदार
२१. भूतकाळ
२३. सुविधा
२४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी
२६. पुरुष
२७. पाताळ
२९. न वापरलेला
३०. नसलेला
३१. श्रीरामाचे स्तोत्र
३२. गंध
३४. जाड पोळी
३७. तंबूची कापडी भिंत
३८. साखळी लावलेला दिवा
३९. बोटाच्या टोकावरील आवरण
४०. लक्षाचा आकडा
४२. तापापूर्वीचे शहारे
४४. वेल
४५. फार गार वा उष्ण नसलेले
४६. निर्लज्ज
४८. साठ मिनिटे
५०अ. ढग
५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
५४. पार्वती
५४अ. डुक्कर
५६. सुतळीच्या धाग्याचे कापड
५९. मदत
६०. संगीतातील एक राग
६१. झटकन
६२. मनोहरी, रम्य
६४. विरोध
६६. प्रत्येक, किंमत
६७. काळिमा, बट्टा
६८. डाक, पत्र
७०. श्वासाचा अवयव
७२. राक्षस
७५. लत्ताप्रहार
७७. जून्या जखमेची खूण

### आडवे उत्तर

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ. जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३. वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

### उभे उत्तर

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रवानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरमगरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ. कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण

## दयानंद विज्ञानच्या संगणकशास्त्र विभागातील दोन विद्यार्थीनींची बेंगलोर येथील कॉग्निझंट कंपनीत निवड




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रतीक्षा बलभीम भोसले व चैताली जाधव या दोन्ही विद्यार्थीनींची बेंगलोर येथील कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कॉग्निझंट) येथे डेटा ॲनालिस्ट म्हणून निवड झाली आहे.

त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू, प्रा.सुजाता काळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## मराठी साहित्याच्या क्षेत्रात कुसुमाग्रजांचे स्थान एखाद्या दीपस्तंभासारखे : माळी



**लातूर/प्रतिनिधी :** जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठी साहित्याच्या क्षेत्रात कुसुमाग्रजांचे स्थान एखाद्या दीपस्तंभासारखे आहे.१० मार्च १९९९ रोजी त्यांच्या निधनानंतर, त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या साहित्यिक वारशाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जन्मदिवस अधिकृतपणे साजरा करण्याची मागणी होत होती. २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात ऐतिहासिक शासन निर्णय निर्गमित केला आणि २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून घोषित केला.मराठी माणसाच्या जीवनात या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा केवळ एक दिनविशेष नसून, तो मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी स्वतःला वाहून घेण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. मराठी साहित्यातील समृद्धता, तिचे सौंदर्य आणि भाषिक विविधता नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे या दिनाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. अनेकदा लोकांमध्ये 'मराठी राजभाषा दिन' आणि 'मराठी भाषा गौरव दिन' या दोन दिवसांबाबत गोंधळ निर्माण होतो. परंतु, हे दोन्ही दिवस स्वतंत्र आहेत आणि त्यांचे महत्त्वही वेगळे आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, त्यानिमित्ताने १ मे हा दिवस 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो, तर २७ फेब्रुवारी हा दिवस साहित्याच्या गौरवासाठी कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित्त समर्पित आहे. असे प्रतिपादन नंदकिशोर माळी यांनी केले.

या प्रसंगी पर्यवेक्षक तानाजी घाटके, परीक्षा विभाग प्रमुख विश्वनाथ सिंधीकुमठे,गिरीष रंदाळे, नंदकिशोर माळी,डॉ.गणपत माने, डॉ.सुशिल शिंदे,निता तांभाळे,संभाजी वारकड ,रामदास लातूरे, अमर येळंबकर, संगमेश्वर भेंडेगावे, रंजना राशिनकर,गीता पाटील, संकेत बनसोडे, गजानन घोंगडे,आकाश लोहार, उपस्थित होते.

## मराठी भाषा केवळ संवादाची नव्हे, संस्कृतीची भाषा : प्रा. चंद्रकांत शेरखाने



**लातूर/प्रतिनिधी :** '' कुसुमाग्रजांनी मराठी भाषेकडे केवळ अभिव्यक्तीचे साधन म्हणून पाहिले नाही, तर तिला स्वाभिमान, आत्मसन्मान आणि सांस्कृतिक ओळख दिली. मराठी भाषा कमी लेखली जाऊ नये, यासाठी त्यांनी आयुष्यभर ठाम भूमिका घेतली. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपली संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपणारी भाषा आहे. नवीन पिढीने मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर केला पाहिजे.'' असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय, रेणापूर येथील प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बा ळगाव येथे मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रकांत शेरखाने बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे भूषवले होते. अध्यक्ष समारोप करताना तर ते म्हणाले,''मराठी ही ज्ञान, व्यवहार आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी भाषा आहे. पाहुण्यांनी मांडलेले विचार विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत. महाविद्यालयामधूनच मराठी भाषेप्रती प्रेम, आदर आणि अभिमान निर्माण होणे आवश्यक असून त्यासाठी असे उपक्रम सातत्याने मराठी विभागाच्या वतीने राबवले जातात.'' तर मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, ''शुद्ध आणि प्रभावी मराठी भाषेचा वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते. मराठी वाचन, लेखन आणि वक्तृत्व यामधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.''

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विवेक गोस्वामी यांनी केले तर प्रा. महारुद्र बिडवे, माजी विद्यार्थी हनुमंत शिंदे यांनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे प्रांजली आणि आभार साधना भालेराव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, डॉ. कांतराव पोले, श्री सगर, प्रा. संतोष कल्याणकर, धामनगावे कृष्णा, सुरवसे त्रृषिकेश, गणेश साखरे, जाधव कृष्णा,पूजा सवारे यांनी सहकार्य केले.

# लातूर जिल्हा रुग्णालयाच्या कामाला गती द्या!

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांची विधानसभेत मागणी; निविदा प्रक्रिया पूर्ण होताच बांधकाम सुरू करण्याची सरकारची ग्वाही



**मुंबई/प्रतिनिधी :** लातूर येथे जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासनाकडून पावले उचलली जात असली, तरी प्रत्यक्षात या कामाची गती अत्यंत संथ आहे. सर्वसामान्य जनतेला वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी हे रुग्णालय होणे अत्यावश्यक आहे.

मग या जिल्हा रुग्णालयाचे प्रत्यक्ष बांधकाम कधी सुरू होणार? असा राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान प्रश्नोत्तराच्या तासात आमदार अमित देशमुख यांनी लातूरच्या प्रलंबित आरोग्य प्रकल्पांकडे सरकारचे लक्ष वेधले. आमदार अमित देशमुख सभागृहात म्हणाले की, प्रशासकीय स्तरावर हालचाली दिसत असल्या तरी जमिनीवर कामाची प्रगती शून्य आहे.

ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत आहे, त्यामुळे हे सरकारी रुग्णालय तातडीने होणे गरजेचे आहे.

विनाविलंब कामाला सुरुवात करण्यासाठी सरकारने निश्चित कालमर्यादा स्पष्ट करावी.

आमदार अमित देशमुख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री सौ. मेघना बोर्डीकर यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की: लातूर जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या अंतिम टप्प्यात असून, ती पूर्ण होताच प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्यात येईल. लातूरकरांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या चर्चेमुळे गेल्या काही काळापासून रखडलेल्या लातूर जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नाला आता पुन्हा एकदा चालना मिळाली असून, लवकरच कामाला सुरुवात होईल अशी आशा निर्माण झाली आहे.

## मुक्त विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन निमित्त माझी मराठीतील स्वाक्षरी या अभिनव उपक्रम

### मराठी स्नेह-शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन



**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन निमित्त 'माझी मराठीतील स्वाक्षरी या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच मराठी स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष आणि महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शन - उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी फीत उलगडून व मराठीत स्वाक्षरी करून केले.

यावेळी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की मराठी भाषेचे विज्ञान आधी समजून घेवून मग त्या भाषेचा व्यवहारात उपयोग कसा करायचा हे ठरवले पाहिजे. मराठी भाषा ही अतिशय लवचिक, वेळप्रसंग व संदर्भानुसार शब्दांचा अर्थ बदलत असल्याने शब्दांचा नेमका व यथोचित वापर करता आला पाहिजे. मराठी भाषिक असूनही रोज एक नवीन मराठी शब्द शिकला पाहिजे, आत्मसात केला पाहिजे. त्यासाठी सातत्याने दर्जेदार मराठी वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी माता, मातृभूमी व मातृभाषा यांचे आपल्यावरील उपकार अनंत व फ ेडता येणार नाही असे असतात. त्याची जाणीव ठेवून सर्वांनी आचरण करावे व मराठी भाषेचा वारसा जपावा असे आवाहन त्यांनी केले. डॉ. दयाराम पवार, डॉ. पुनम वाघ व डॉ. बाळासाहेब दिघे यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, सुरक्षा कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले तर जनसंपर्क कक्षाचे सहायक श्री. राजेश बर्वे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनसंपर्क अधिकारी श्री. महेंद्र बनसोडे, श्री. सचिन तरवटे, श्रीमती प्रतिभा काशीद व श्री. नितीन जोंधळे यांनी परिश्रम घेतले.

## मराठी भाषेचा अभिजातपणा जोपासावा : सुप्रसिद्ध कवी, लेखक प्रा. देवदत्त मुंढे



**लातूर/प्रतिनिधी :** मराठी भाषा ही महाराष्ट्राचे अस्तित्व आणि अस्मिता असून मराठी भाषेचा अभिजातपणा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. देवदत्त मुंढे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय व संस्कृती विभागाच्या वतीने आयोजित 'मराठी भाषा गौरव दिना'च्या विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे हे होते. तर विचारपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. व्यंकट दुडीले आदी मान्यवर विराजमान होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना प्रा. मुंढे म्हणाले की, मराठी भाषा ही आज जगभरात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आभासी मायाजाळात सर्वात लोकप्रिय अशी भाषा आहे. मराठी भाषिकांनी आत्मविश्वासाने आपले भाषिक व्यवहार मातृभाषेतून करायला हवेत. भाषेच्या माध्यमातूनच मानवी जीवनाचा वेध घेतला जातो. साहित्यात मानवी जीवनाचे दर्शनच असते. त्यामुळे तरुणांनी साहित्य विषयक जाणीवा अधिकाधिक समृद्ध करून भाषेचा गौरव वाढविला पाहिजे.

श्रवण, वाचन, लेखन, भाषण यातून व्यक्तीचे जीवन अधिकाधिक समृद्ध होते. साहित्य माणसाला जोडण्याचे काम करते. मराठी भाषिक माणसांनी विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्ताचा वेगळा ठसा उमटवल्यास भाषेला आपोआपच श्रेष्ठत्व प्राप्त होते, असे सांगून त्यांनी निशिगंध, माणसाने, या नजरेने, साधू, संधीसाधू यासारख्या गझल व वात्रटीका सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे म्हणाले की, महाराष्ट्रीयन संतांनी मराठी भाषेचा वेलू गगनावर नेला. जगभरात ही भाषा बोलली जाते. मराठी भाषेविषयी कोणतीही अनास्था न ठेवता भाषिक प्रेम अधिकाधिक वृद्धिंगत करून मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संवर्धन करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे असेही ते म्हणाले. यावेळी कु. साक्षी घोडके, कु. अवंतिका यादव या युवा कवयित्रींनी आपल्या कविता सादर केल्या. तर प्रा. डॉ. धोंडीबा भुरे, प्रा. डॉ. अश्विनी रोडे यांनीही मराठी भाषेचे गोडवे गायले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मारुती माळी यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. शंकर भोसले यांनी सभागृहाला करून दिला. तर उपस्थितांचे आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. विद्या ढवारे, कार्यालय प्रमुख श्री नामदेव बेंदर्गे, बालाजी डावखरे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये वामसी फार्मा लिमिटेड चे कॅम्पस इंटरव्ह्यू संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** औषधनिर्मिती क्षेत्रातील हैदराबाद येथील अग्रगण्य कंपनी वामसी फार्मा प्राइवेट लिमिटेड यांच्या वतीने दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे नुकताच कॅम्पस इंटरव्ह्यू ड्राइव्ह मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे अंतिम वर्षातील एम.फार्मसी,बी.फार्मसी व डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांना नामांकित औद्योगिक क्षेत्रात नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वामसी फार्मा कंपनीच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.कंपनीच्या पॅनेलमध्ये मॅनेजमेंट रिप्रेझेंटेटिव्ह व सर्टिफाईड क्वालिटी ऑडिटर प्रसाद पारेकर,एचआर ऑफिसर योगेश आलुरे हे मान्यवर उपस्थित होते.

या कॅम्पस ड्राइव्हसाठी कंपनीचे मानव संसाधन विभागाचे अधिकारी व तांत्रिक तज्ञ विशेष उपस्थित होते. निवड प्रक्रियेत प्रथम लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण,जी.एम. पी.नियमावली आदी विषयांवर आधारित तांत्रिक मुलाखती घेण्यात आल्या.अंतिम टप्प्यात वैयक्तिक मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य,आत्मविश्वास व कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. या निवड प्रक्रियेत मोठ्या संख्येने महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.स्पर्धात्मक वातावरणात गुणवत्तेच्या आधारे २९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या वतीने अनिल बिरादार (टी.पी.ओ.दयानंद शिक्षण संस्था),प्रा.रोहित सारडा (टी.पी.ओ. दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी), प्रा.योगेश कुलकर्णी, डॉ.बालाजी शेटकर,प्रा.महेश बिराजदार, प्रा.निर्भय चलमले,प्रा.तनुजा वारद यांचे विशेष योगदान लाभले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी उद्योग-शिक्षण दुवा अधिक मजबूत करण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाईलअसे सांगितले.प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा कॅम्पस ड्राइव्ह यशस्वीरीत्या पार पडला.या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून, भविष्यातही अशाच नामांकित कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी,सहसचिव विशाल लाहोटी,सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते,सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मध्य रेल्वे होळी उत्सव आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये दौंड-कलबुरगि विशेष गाड्यांची सेवा सुरु ठेवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** खाली दिलेल्या तपशीलांनुसार प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे होळी उत्सव आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये दौंड-कलबुरगि विशेष गाड्यांची सेवा सुरू ठेवणार आहे:

***दौंड - कलबुरगि आठवड्यातून ५ दिवस अनारक्षित विशेष गाड्या (१९६ फेऱ्या)***

- ट्रेन क्रमांक ०१४२१/०१४२२ दौंड-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष गाड्या २८.०२.२०२६ पर्यंत आठवड्यातून ५ दिवस (गुरुवार आणि रविवार वगळता) धावण्यासाठी अधिसूचित केल्या होत्या त्या आता १५.०७.२०२६ पर्यंत धावतील.

***दौंड-कलबुरगि द्वि-साप्ताहिक अनारक्षित विशेष गाड्या (७८ फेऱ्या)***

- ट्रेन क्रमांक ०१४२५/०१४२६ दौंड-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष गाड्या २६.०२.२०२६ पर्यंत दर गुरुवार आणि रविवारी धावण्यासाठी अधिसूचित केल्या होत्या त्या आता १५.०७.२०२६ धावतील.

वरील गाड्यांच्या वेळा, रचना आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटे घेऊन प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे. अनारक्षित कोचसाठी स्टेशनवरील बुकिंग काउंटर आणि रेलवन ॲपद्वारे देखील बुकिंग करता येते.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा रेलवन ॲप किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मेडिकल कोडिंग आणि फार्मास्युटिकल इंडस्ट्रीजमधील करिअर संधी

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- एएसपीएम संस्थेचे के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, धाराशिव येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मेडिकल कोडिंग आणि फार्मास्युटिकल इंडस्ट्रीजमधील करिअर संधी' या विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार मोठ्या उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रम बी. फार्म अंतिम वर्ष तसेच फार्म डी सहाव्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. रोहन आर. कुर्री (एमडी - वर्कफोर्स सेंटर प्रा. लि., संस्थापक - एज्यु सेंटर) तसेच श्री. विवेक सुरवसे (संस्थापक - एम कोडर, सहसंस्थापक - एज्यु सेंटर) उपस्थित होते. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

मार्गदर्शनपर सत्रामध्ये मेडिकल कोडिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधी, आवश्यक कौशल्ये, प्रशिक्षण प्रक्रिया, पगाराची श्रेणी तसेच देश-विदेशातील रोजगाराच्या संधी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच फार्मास्युटिकल उद्योग, क्लिनिकल रिसर्च, फार्माकोव्हिजिलन्स आणि ड्रग सेफ्टी या क्षेत्रांतील विविध करिअर पर्यायांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले व आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अमोल ए. जोशी होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांनी पारंपरिक नोकरीच्या संधींबरोबरच नव्या व उदयोन्मुख क्षेत्रांकडे वळावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे समन्वयक श्री. इम्रान एम. मोमीन व श्री. व्यंकट चौगुले यांनी उत्कृष्ट नियोजन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुजाता भोसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. दिप्ती कुलकर्णी यांनी केले.

सदर सेमिनारमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आरोग्य क्षेत्रातील विविध करिअर मार्गांची सखोल माहिती मिळाली असून, भविष्यातील करिअर नियोजनासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# कळंब नगर परिषदेचा ७२ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर; विकासाच्या गप्पा की प्रत्यक्ष कामांचा आराखडा?

कळंब (प्रतिनिधी)- आगामी आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी सादर करण्यात आलेल्या ७२ कोटी रुपयांच्या वार्षिक अर्थसंकल्पास कळंब नगर परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या बैठकीत कोणताही विरोध नोंदविला गेला नाही. मात्र शहरातील रखडलेली कामे, प्रलंबित प्रश्न आणि अपूर्ण सुविधा पाहता हा अर्थसंकल्प प्रत्यक्षात किती प्रभावी ठरणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नगर परिषद सभागृहात प्रशासनाकडून उत्पन्न-खर्चाचा सविस्तर आढावा सादर करण्यात आला. अर्थसंकल्पात पाणीपुरवठा, सांडपाणी व गटार व्यवस्था, रस्ते विकास, स्वच्छता व आरोग्य सेवा, विद्युत सुविधा, सार्वजनिक मालमत्तेची देखभाल तसेच विविध सामाजिक योजनांसाठी तरतुदी करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पातील तरतुदींपैकी किती कामे पूर्ण झाली, याचा स्पष्ट हिशोब सभागृहात मांडला गेला का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे उपस्थित होत्या. उपनगराध्यक्ष लखनजी गायकवाड, मुख्याधिकारी मंजुषा गुरमे, शिवसेना गटनेते अतुलजी कवडे, विरोधी पक्ष गटनेते संजयजी मुंदडा यांच्यासह सर्व नगरसेवक-नगरसेविका व अधिकारी उपस्थित होते.

नगराध्यक्षा कापसे यांनी ७२ कोटींचा अर्थसंकल्प शहराच्या विकासाचा दिशादर्शक ठरेल. नागरिकांच्या सोयीसुविधांना प्राधान्य देत सर्व कामे पारदर्शक व वेळेत पूर्ण केली जातील, अशी ग्वाही दिली. तर मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि आर्थिक नियमांचे पालन करून विकासकामांची अंमलबजावणी केली जाईल, असे स्पष्ट केले.

मात्र शहरातील रस्त्यांची दुरवस्था, अपुरी पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छतेचे प्रश्न आणि अर्धवट प्रकल्प पाहता नागरिकांचा प्रश्न एकच - दरवर्षी कोट्यवधींचे अर्थसंकल्प मंजूर होतात; पण बदल नेमका कुठे दिसतो?

७२ कोटींच्या अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजुरी मिळाल्याने कागदोपत्री विकासाचा मार्ग मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्षात कामे वेळेत, दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण झाली तरच या अर्थसंकल्पाला खऱ्या अर्थाने यश मिळेल. अन्यथा हा केवळ आकड्यांचा खेळ ठरू नये, अशी नागरिकांची ठाम भूमिका आहे.

# तीन म्हशी एकुण १,०५,०००च्या अज्ञाताने चोरल्या

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे :फिर्यादी नामे- अमोल उत्तमराव सोनसाळी, वय ४७ वर्षे, रा. शेकापुर ता. जि. धाराशिव ह.मु. काळामारुती चौक धाराशिव यांचे शेकापूर शिवारातील शेतातील गोठ्यातुन ३ म्हशी एकुण १,०५,००० किंमतीच्या अज्ञात व्यक्तीने दि.१२.०१.२०२६ रोजी १९.०० ते दि. १३.०१.२०२६ रोजी ०७.०० वा. सु. चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल सोनसाळी यांनी दि.२५.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# पोलीस कॉन्स्टेबल गणपतसिंग चव्हाण यांचे दुःखद निधन : नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने दिली मानवंदना



नळदुर्ग (विजय पिसे)- वागदरी तालुका तुळजापूर येथील सुपुत्र व सध्या सोलापूर शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सेवेत कार्यरत असलेले गणपतसिंग मोहनसिंग चव्हाण यांचे अल्पशा आजाराने दि.२१ फेब्रूवारी २२६ रोजी सायंकाळी ठिक ५. वा. दरम्यान वयाच्या ४३ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे.

. गणपतसिंग चव्हाण हे महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती वागदरीचे माजी उपाध्यक्ष ज्येष्ठ कार्यकर्ते मोहनसिंग चव्हाण यांचे चिरंजीव होते.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत,गावातील मित्र परिवारासोबत गावात होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन सर्वांना हसत खेळत सर्वांसोबत खोड्या करत वाढलेलं हे व्यक्तिमत्व सतत मित्र परिवाराच्या घोळख्यात राहणारा व सर्वांना हवाहवासा वाटणारा मित्र सोलापूर पोलीस दलात भरती होतो आणि पोलीस दलाच्या माध्यमातून जनतेची सेवा करतो याचा सार्थ अभिमान सर्व मित्रांना होता व आहे.जेंव्हा जेंव्हा गावातील व्यक्ती सोलापूरला गेल्यानंतर वेळ प्रसंगाला धावून येणारा आपला एक हक्काचा माणूस सोलापुरात आहे असं सर्वांना वाटणारं व्यक्तीमत्व म्हणजे गणपतसिंग चव्हाण

ते गेल्या काही दिवसापासून आजारी होते. दवाखान्यात उपचार चालू असतानाच वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी त्यांचं दुःखद निधन झालं ही घटनाच कोणालाही सहन न करणारी आहे.अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद अशी ही घटना आहे.त्यांच्या जाण्याने एक अवलिया मित्र आपण गमावला, पोलीस दलातील एक धाडसी व्यक्तिमत्व असलेल्या मित्राला आपण पोरके झालो आहोत अशा भावपूर्ण शब्दात मित्रपरिवारानी त्याना श्रध्दांजली वाहीली.दि.२२ फेब्रुवारी २२६ रोजी वागदरी ता.तुळजापूर येथे कै.पो.काँ गणपतसिंग चव्हान यांच्या पार्थिवा देहावर अंतिम संस्कार करण्यात आले.या प्रसंगी नळदुर्ग पोलीस ठाण्याले पोलीस निरिक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांनी आपल्या पोलीस पथकासह पुष्पचक्र वाहून मानवंदना दिली असून सहाश्रू नयनाने समुदायानी त्याना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात आई,वडिल,पत्नी,दोन मुले, तिन भाऊ असा मोठा परिवार आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर ट्रकने दुचाकीला धडक; पत्नी ठार, पती गंभीर जखमी




वाशी(प्रतिनिधी)-राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील कान्हेरी पाटी येथे बुधवारी रात्री सव्वा दहाचा सुमारास ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पत्नी जागीच ठार तर पती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

शहरातील समाधान भगवान पुणेकर(४५) व पत्नी मनिषा समाधान पुणेकर(४०) हे दाम्पत्य कामानिमित दुचाकीवर(एम एच २५, जे ६६५१) बाहेरगावी गेले होते. रात्री येण्यासाठी उशीर झाल्याने ते शहरापासून तीन किमी अंतरावर असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५२ वर असलेल्या कण्हेरी पाटी येथून महामार्ग ओलांडून शहराकडे येण्यासाठी वाहणारी मोठी वाहने वाहतूक कमी होण्याची वाट पाहत दुचाकी उभा करून उभा होते. यावेळी भरधाव वेगात धाराशिव कडून बीडच्या दिशेने निघेलला ट्रक (एमएच १८, बीए ०६८५) ने जोराची धडक देत मनिषा यांना फरफटत नेले तर बसलेल्या धडकेमुळे पायाला जबर मार लागून समाधान एका बाजूला उडून पडले. यात मनिषा यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताचा आवाज ऐकताच जवळच असलेल्या ढाब्यावर असलेल्या लोकांनी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले.

धडक दिल्यानंतर ट्रक चालकाने न थांबता तेथून वाहनासह पळ काढला. घटनेची माहिती मिळताच शहरातील अनेक नागरिक घटनास्थळी व रुग्णालयात गेले होते. प्राथमिक उपचार करून समाधान यांना बार्शी येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले होते. तर गुरुवारी सकाळी मयत मनिषा यांच्यावर शहरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत मनिषा या वाशी न्यायालयात कंत्राटी संगणक चालक म्हणून काम करत होत्या. त्यांच्या पश्चात जखमी पती समाधान एक मुलगी,एक मुलगा असा परिवार आहे.

पोलिसांकडून शोध सुरू धडक दिल्यानंतर चालकाने ट्रक न थांबवता वाहनासह पळ काढला होता. अंधार असल्याने अथवा कोणी कोणत्या वाहनाने धडक दिली हे पाहिले नव्हते. मात्र घटनेची वेळ आणि पारगाव टोलनाक्यावरून जाणारी वाहने याचा माग वाशी पोलिसांनी काढत. सीसीटीव्ही फुटेज तपासले. ज्यामध्ये समोरील बाजूचे बंपर वाकडे झालेले व तुटलेला ट्रक याच कालावधीत गेल्याचे दिसला. पोलिसांनी सदरील ट्रकचा फोटोमधून नंबर मिळवत शोध सुरू केला आहे.

**Name of Change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have Change My Name which was : **SHAIKH SADEQUE ALI DAWOD MIYA**
TO: **SHAIKH SADEQUEALI DAWOODSAB**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SHAIKH SADEQUEALI DAWOODSAB** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH SADEQUE ALI DAWOD MIYA**
NEW NAME :- **SHAIKH SADEQUEALI DAWOODSAB**
Address - Mohammed Panah Mohalla Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-874780864604
Mob.77760046617

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# जळकोट येथील श्री कुलस्वामिनी आश्रम शाळेत मराठी गौरव भाषा दिन उत्साहात साजरा



जळकोट (विजय पिसे)-तालुका तुळजापूर येथील श्री कुलस्वामिनी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत २७ फेब्रुवारी हा कविवर्य ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी, कथाकार, नाटककार, कवी कुसुमाग्रज विष्णू वामन शिरवाडकर जयंती मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे सचिव तथा प्राचार्य श्री संतोष चव्हाण साहेब तर प्रमुख अतिथी म्हणून आलियाबादचे सरपंच आदरणीय सूर्यकांत चव्हाण गुरुजी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम, इंदिरा गांधी आदर्श माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विनायक राठोड सर, माध्यमिक आश्रम शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री नागेंद्र गुरव,आश्रम शाळा होर्टीचे सहशिक्षक उमाकांत माळी उपस्थित होते सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण साहेब प्रमुख अतिथी म् अलियाबादचे सरपंच आदरणीय सूर्यकांत चव्हाण गुरुजी, मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन केले प्रतिमा पूजनानंतर शाळेतील मराठी विषय विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण साहेब यांचे स्वागत श्री बिळेणसिध्द हक्के यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.व सरपंच सूर्यकांत चव्हाण गुरुजी यांचे स्वागत कारले सर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले सर्व प्रथम सर्व प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या स्वागतानंतर शाळेत निपुण भारत अंतर्गत इयत्ता आठवी, नववी, दहावी वर्गातील मराठी विषय मित्र विद्यार्थी इयत्ता आठवी कार्तिक श्रीमंत राठोड,रेखा दुधाजी जाधव इयत्ता नववी ,अक्षरा सुनील चव्हाण , अर्चना विलास राठोड इयत्ता दहावी वर्गातील नेहा एकनाथ राठोड व मल्लिनाथ हसनप्पा वासुदेव या विद्यार्थ्यांचे मराठी भाषा दिनास अनुसरून मराठी विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण साहेब व प्रमुख अतिथी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मडम , इंदिरा गांधी आदर्श माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री विनायक राठोड सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले यावेळी कार्यक्रमास अनुसरून अक्षरा सुनिल चव्हाण व भाग्यश्री राजकुमार राठोड या विद्यार्थिनी भाषण केले त्यानंतर मराठी विषय शिक्षक श्री बिळेणसिद्ध हक्के यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा दिनाची माहिती दिली अध्यक्षीय भाषणात संतोष चव्हाण साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन करताना मराठी भाषेचा व्यवहारात वापर करावा इतर भाषा शिकव्यात पण मराठी भाषेचा अभिमान बाळगा, पण इतर भाषांना पण तेवढेच महत्व द्या पण मराठी भाषेला सुद्धा कमी लेखू नका आजच्या काळात इंग्रजीचे महत्त्व वाढले असले तरी मराठी भाषेचा सन्मान राखणे आणि तिचा वापर करणे आपली जबाबदारी आहे. मराठी भाषा टिकवणे म्हणजे आपली संस्कृती जपणे होय.

कार्यक्रमाचे योग्य नियोजन बिळेणसिद्ध हक्के ,बालाजी राठोड व खंडेराव कारले यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी राठोड यांनी केले .मराठी विषय शिक्षक श्री बिळेणसिद्ध हक्के यांनी सुमधुर भाषेत सूत्रसंचालन केले आभार खंडेराव कारले यांनी मानले. फलक लेखन देवानंद पांढरे सर यांनी केले यावेळी अभिजीत चव्हाण,ढोल के.ए.,मुखम बी.एस.,दुधभाते एस.एन.कोकाटे एस.एम,साबळे ए.एच, कदम डी. टी. अतुल जावळे ,श्रीमती कुचंगे पी.एस.लवंद के.बी. अश्विनी लबडे, शांताबाई चौगुले,कुमारी मयुरी कांबळे, सागर चव्हाण,अमित खारे,शंकर चव्हाण व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649